27 APR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अमर हबीब : शिवाजी विद्यापीठामधील व्याख्यानात मार्गदर्शन

# महर्षी शिंदेंचे शेतीविषयक विचार पथदर्शक

कोल्हापूर : शेती, शेतीमाल आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सध्या बिकट झाले आहेत. अशा काळात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचारांचे औचित्य भारतीय समाजाला पथदर्शक ठरणारे आहे, असे प्रतिपादन लेखक अमर हबीब यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे शेतीविषयक विचार व सद्य:स्थिती' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. विद्यापीठातील वि. स. खांडेकर सभागृहामधील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील होते. महर्षी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

लेखक अमर हबीब म्हणाले, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकऱ्यांमध्ये अपूर्व जागृती निर्माण करण्याचे महत्कार्य महर्षी शिंदे यांनी केले. ते सामाजिक कार्याचा परीघ उल्लंघणारे श्रेष्ठ विचारवंत होते. त्यांच्या विचार आणि कार्यामध्ये शेतीमालाच्या भावापासून गावगाड्याच्या पुनर्रचनेची बीजे सामावलेली आहेत. महाराष्ट्र आज 'आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा प्रदेश' म्हणून ओळखला जात आहे. सध्या

नसीर अत्तार



शिवाजी विद्यापीठात बुधवारी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे आयोजित व्याख्यानात लेखक अमर हबीब यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून मराठी विभागप्रमुख राजन गवस, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील, ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते.

### आंदोलनासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकरी परिषदांच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याला महर्षी शिंदे यांनी प्राधान्य दिले. शेतकऱ्यांच्या आंदोलनाची जबाबदारी आजच्या काळात किसानपुत्रांची आहे. ती पेलण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे, असे मत लेखक हबीब यांनी व्यक्त केले.

शेती, शेतीमाल आणि शेतकऱ्यांचे प्रश्न बिकट झाले आहेत. अशा काळात महर्षी शिंदे यांच्या विचारांचे औचित्य व द्रष्टेपण भारतीय समाजाला पथदर्शक ठरणारे आहे.

ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात महर्षी शिंदे यांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. उपेक्षित मानकऱ्यांचे धनी ठरलेल्या शिंदे यांनी विविध क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे विस्मरण ही शोकांतिका ठरेल.

ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर म्हणाले, महर्षी शिंदे यांनी शेतीविषयक मोलाचे विचार मांडले. स्वराज्याचा पुरस्कार करणाऱ्या गावगाड्याची पुनर्रचना आवश्यक आहे. लोकांना खऱ्या धर्मसाधनेचा परिचय करून दिला पाहिजे, असे त्यांचे मत होते.

या कार्यक्रमात 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार' मिळाल्याबद्दल डॉ. चौसाळकर यांचा मराठी अधिविभागप्रमुख डॉ. राजन गवस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. ल. रा. नसिराबादकर, सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिपूरकर, दिलीप पवार, आशा कुकडे, डॉ. टी. एस. पाटील, संपतराव पवार, प्रकाश पवार, पी. ए. अत्तार, मेघा पानसरे, अर्जुन चव्हाण, अवनीश पाटील, आदींसह शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते, विद्यार्थी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

27 APR 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांचे द्रष्टेपण भारतीय समाजाला पथदर्शक

## अमर हबीब यांचे प्रतिपादन : शेतकरी आंदोलनाची जबाबदारी किसानपुत्रांची



कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या १४३ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना अमर हबीब. सोबत डावीकडून डॉ. राजन गवस, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. रणधीर शिंदे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे सामाजिक कार्यातील परीघ उल्लंघणारे श्रेष्ठ असे विचारवंत होते. महर्षी शिंदे यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकरी परिषदा घेऊन अपूर्व अशी जागृती केली. शेतीमालाच्या भावापासून गावगाड्याच्या पुनर्रचनेची बीजे त्यांच्या विचारकार्यात सामावलेली आहेत. आज महाराष्ट्र आत्महत्यग्रस्त शेतकऱ्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. शेतीचे, शेतीमालाचे व शेतकऱ्यांचे प्रश्न फार बिकट झाले आहेत. अशा काळात महर्षी शिंदे यांच्या विचारकार्याची औचित्यतता व द्रष्टेपण भारतीय समाजाला नेहमीच पथदर्शक ठरतील, असे विचार शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते पत्रकार अमर हबीब यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्यावतीने आयोजित केलेल्या 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या 'शेतीविषयक विचार व सद्यःस्थिती' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. आजच्या काळात शेतकरी आंदोलनाची जबाबदारी किसानपुत्रांची आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.एन. डी. पाटील म्हणाले, उपेक्षित मानकऱ्यांचे धनी ठरलेल्या शिंदे यांनी विविध क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे विस्मरण ही शोकांतिका ठरेल. या प्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजन गवस यांनी केले. यावेळी डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. रणधीर शिंदे डॉ. नंदकुमार मोर, दशरथ पारेकर, सुरेश शिपुरकर, कॉ. दिलीप पवार, आशा कुकडे, डॉ. टी. एस. पाटील, सुनीलकुमार लवटे, संपतराव पवार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. पी. ए. अत्तार, डॉ. मेघा पानसरे, डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. अवनीश पाटील तसेच कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते.

27 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांच्याकडून शेतकऱ्यांत जागृती : हबीब

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



अमर हबीब

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकऱ्यांमध्ये अपूर्व जागृती निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी केले, असे प्रतिपादन शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते, पत्रकार अमर हबीब यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने आयोजित 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे शेतीविषयक विचार व सद्यस्थिती' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील होते.

हबीब म्हणाले, महर्षी शिंदे श्रेष्ठ विचारवंत होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातशेतकरीपरिषदांच्यामाध्यमातून शेतकऱ्यांत जागृती करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. शेतीमालाच्या भावापासून गावगाड्याच्या पुनर्रचनेची बीजे त्यांच्या विचार व कार्यात सामावलेली आहेत. आज महाराष्ट्र आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. शेतीचे, शेतीमालाचे व शेतकऱ्यांचे प्रश्न बिकट झाले आहेत. अशा काळात महर्षी शिंदे यांच्या विचारांचे औचित्य व द्रष्टेपण भारतीय समाजाला पथदर्शक ठरणारे आहे.

डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात महर्षी शिंदे यांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. उपेक्षित मानकऱ्यांचे धनी ठरलेल्या शिंदे यांनी विविध क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे विस्मरण ही शोकांतिका ठरेल.

डॉ. अशोक चौसाळकर यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक, तर डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी डॉ. ल. रा. नसिराबादकर, डॉ. जे. एफ. पाटील, सुरेश शिपूरकर, कॉ. दिलीप पवार, आशा कुकडे, डॉ. टी. एस. पाटील, सुनीलकुमार लवटे, संपतराव पवार, डॉ. प्रकाश पवार, डॉ. पी. ए. अत्तार, मेघा पानसरे, डॉ. अर्जुन चव्हाण, डॉ. अवनीश पाटील, तसेच शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले.

2 7 APR 2017 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महर्षी शिंदे यांच्याकडून शेतकऱ्यांत अपूर्व जागृतीचे कार्य

## - अमर हबीब

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य केले, असे गौरवोद्गार शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते, पत्रकार अमर हबीब यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने आयोजित केलेल्या 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे शेतीविषयक विचार व सद्यःस्थिती' या विषयावर ते बोलत होते. वि. स. खांडेकर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील होते.

हबीब म्हणाले, महर्षी शिंदे सामाजिक कार्याचा परीघ उल्लंघणारे श्रेष्ठ विचारवंत होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शेतकरी परिषदांच्या माध्यमातून शेतकऱ्यांत जागृती करण्याला त्यांनी प्राधान्य दिले. शेतीमालाच्या भावापासून गावगाड्याच्या पुनर्रचनेची बिजे त्यांच्या विचार व कार्यात सामावलेली आहेत. आज महाराष्ट्र आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. शेतीचे, शेतीमालाचे व शेतकऱ्यांचे प्रश्न बिकट झाले आहेत. अशा काळात महर्षी शिंदे यांच्या विचारांचे औचित्य व द्रष्टेपण भारतीय समाजाला पथदर्शक ठरणारे आहे. आजच्या काळात शेतकरी आंदोलनाची जबाबदारी किसानपुत्रांची आहे. ती पेलण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे येण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात महर्षी शिंदे यांचे स्थान अव्वल दर्जाचे आहे. उपेक्षित मानकऱ्यांचे धनी ठरलेल्या शिंदे यांनी विविध क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे विस्मरण ही शोकांतिका ठरेल. या प्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर यांना महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. डॉ. राजन गवस यांनी प्रास्ताविक केले. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी ल. रा. नसिराबादकर, जे. एफ. पाटील, दशरथ पारेकर, सुरेश शिपूरकर, कॉ. दिलीप पवार, आशा कुकडे, टी. एस. पाटील, सुनीलकुमार लवटे, संपतराव पवार, प्रकाश पवार, पी. ए. अत्तार, अवनीश पाटील आदी उपस्थित होते.

27 APR 2017 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घोडावत इन्स्टिट्यूटचे 'उमंग' नियतकालिक प्रथम

**जयसिंगपूर/ प्रतिनिधी :**

संजय घोडावत इन्स्टिट्यूटच्या 'उमंग' या वार्षिक नियतकालिकेला शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या नियतकालिका स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. २४ एप्रिल रोजी शिवाजी विद्यापीठात विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. संजय घोडावत इन्स्टिट्यूटच्या वतीने संस्थेचे संचालक डॉ. व्ही. ए. रायकर व उमंगचे संपादक प्रा. योगेश धुळूगडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



**कोल्हापूर : उपकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. रायकर. सोबत प्राध्यापक व संपादक वर्ग.**

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. एस . पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, मानवीयता विभागाच्या अधिष्ठाता डॉ. व्ही. पी. रासम, आय. डी. एस. विभागाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत व विविध व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक महाविद्यालयांचे प्राचार्य व संपादक आदींची उपस्थिती होती.

शिवाजी विद्यापीठ संलग्न महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेत बिगर व्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सृजनशीलतेची जोपासना व्हावी. व ती अधिकाधिक वृद्धिंगत व्हावी. यासाठीच महाविद्यालयामार्फत दरवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात. महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विद्यापीठाकडून प्रतिवर्षी नियतकालिका स्पर्धा आयोजित करतात. या वर्षी या स्पर्धेमध्ये व्यावसायिक व बिगर व्यावसायिक ८८ महाविद्यालयांनी आपला सहभाग नोंदविला होता. संजय घोडावत इन्स्टिट्यूटच्या 'उमंग' या नियतकालिकेमध्ये 'मेक इन इंडिया' या विषयावर प्रामुख्याने जास्त भर देण्यात आला होता. तसेच सध्याचे असलेले तंत्रज्ञान व संशोधन यावरही विविध लेख प्रकाशित करण्यात आले होते.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन संजयजी घोडावत यांनी संचालक डॉ. व्ही. ए. रायकर व विश्वस्त विनायक भोसले तसेच सर्व स्टाफचे अभिनंदन केले. संस्थेचे संचालक डॉ. व्ही. ए. रायकर यांनी यशाचे सर्व श्रेय संपादक प्रा. योगेश धुळूगडे, सचिन महामुनी, विनायक माने, टीम, सहभागी विद्यार्थी व स्टाफ यांना दिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 APR 2017
Times of India

# 'More colleges must take part in magazine competition'

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** At the award distribution ceremony conducted at Shivaji University, Kolhapur (SUK) earlier this week, pro vice-chancellor D T Shirke said that more affiliated colleges must participate in the magazine competition.

At the award ceremony, Shirde honoured the magazine competition winners for the year 2016-16 in which conventional courses group Deshbhakt Anandrao Balwantrao Naik Arts and Science College at Chikhali in Sangli district won the top honours for their exemplary work in Amar magazine. Whereas, Sanjay Ghodawat Group of Institutions, Atigres Umang magazine won the first prize in the professional course category.

Students of Vivekanand college won the second prize in the conventional category and Annasaheb Dange college of Engineering and Technology won the second prize in the professional category.

The coveted competition has been organised annually since 1970. 73 conventional and 15 professional colleges participated in the competition. Over 291 students were awarded with prize money worth Rs 87,000. Though the event witnessed a satisfactory number of participants, we must encourage students to take part in it.

An SUK official said, "Pro VC's concern is right with the fact that in the last year's competition around 68 conventional colleges and 28 professional courses colleges had participated in the event and many as 260 students were honoured for their write-ups.

He added, "The competition is meant to develop and give students a platform to express their creativity. This is one of the oldest event in SUK's history and students must make the most out of it."

2 7 APR 2017 **Times of India** जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK plans community radio service

Pics: Rahul Gaikwad

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) campus is all set to apply for the community radio service in the current academic session.

A meeting between the SUK officials was been conducted on Wednesday where a tentative budget plan worth Rs 45 lakh was been drawn.

Registrar of SUK, Vilas Nandavadekar told **TOI**, "A five-member committee has been formed to take care of all the requirements under the setting up of community radio service. We have been seeking inputs from the experts in the field which will help us in framing a desired proposal for the community radio project."

Acting pro VC, D T Shirke said, "Experts in the field shared their experience regarding the community radio proposal. We got quite an idea about the benefits and shortcomings in order to start with this service."

"It is not a child's play to set up a community radio service. It is an elongated process which has to pass through levels of scrutiny from seven union ministries. The allocation of the frequency depends on the purpose of the community radio. Since we are setting up the radio channel for educational activity, there will not be much hurdles in it," he said.

"Apart from setting up a community radio service, the university is also focusing on web-radio service. It is comparatively easy to set up a web radio channel. Licence is not required to run a web channel. Anyone who has an internet access, can listen and download the shows. One can make the most from the radio web channel. But it might take up at least two years to set up a community radio service," he added.

"According to the experts, funds of Rs 50 lakh or more can be required for setting up a community radio station. If the community radio and the web-radio are launched simultaneously, SUK will have its presence online as well as offline. We want that the radio channel, both offline and online is set up before 2019. It will be a major boost for the university under the National Assessment and Accreditation Council (NAAC) in its re-accreditation cycle in 2019."

## FEATURES OF PROPOSED SERVICE

- Broadcasting educational programs
- Database of the past lectures and events
- Opening up opportunities for students in the campus



### Already equipped campuses

- Savitribai Phule Pune University | **Vidyavani**
- Film and TV institute of India | **Radio FTII**
- Vidya Pratishthans Institute of Information Technology | **Vasundhara Krushi vahini**
- University of Mumbai | **Radio Must**
- Padmashree Dr D Y Patil Vidyapeeth | **Dnyan Vani**

*(Source: Community Radio Facilitation Centre, Ministry of Information and Broadcasting)*

> Apart from setting up a community radio service, the university is also planning to start a web-radio service. Licence is not required to run a web-radio channel. Anyone who has an internet access, can listen and download the shows. One can make the most from the radio web channel. On the other hand, it might take at least two years to start a community radio service
>
> **D T Shirke** | ACTING PRO VC

जनसंपर्क कक्ष
2 7 APR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ज्योत्स्ना देसाई हिचे यश



आजरा, ता. २६ : शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघातर्फे झालेल्या स्पर्धा परीक्षेमध्ये आजरा महाविद्यालयाच्या ज्योत्स्ना रवींद्र देसाई हिने शिवाजी व सोलापूर विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला. ती बीएस्सी भाग ३ मध्ये शिकत आहे. शिवाजी विद्यापीठात २७ जुलैला होणाऱ्या कार्यक्रमात तिचा गौरव होणार आहे. शिवाजी विद्यापीठ संख्याशास्त्र शिक्षक संघामार्फत शिवाजी व सोलापूर विद्यापीठातील ३२ केंद्रांवर २६ फेब्रुवारीला ही स्पर्धा परीक्षा झाली. तिला जनता एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक चराटी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांचे प्रोत्साहन लाभले. संख्याशास्त्र विभागप्रमुख डॉ. किरण पोतदार, प्रा. विजय नेवरेकर, प्रा. प्राजक्ता तिबिले, प्रा. वर्षाराणी पाटील, प्रा. वैशाली मळेकर यांचे मार्गदर्शन मिळाले.